# शाहूकार्यातील सामाजिक न्याय



तथाकथित अस्पृश्यांच्या मुलांसाठी मोफत प्राथमिक शिक्षणाची, राहण्याची व जेवणाची व्यवस्था केली. तसेच त्यांना शिष्यवृत्तीही दिली.

मागासवर्गीयांसाठी नोकरीत 50% आरक्षण लागू केले. अस्पृश्यतेविरुद्ध कायदे करून सामाजिक भेदभावाला आळा घातला.







अस्पृश्य आणि मागासवर्गीय शेतकऱ्यांना शेतीसाठी जमीन दिली.

**शाहू महाराजांनी भारतात सामाजिक न्यायाचा पाया घातला.**

# शाहूकार्यातील स्त्री-पुरुष समानता




शाहू महाराजांनी महिलांना शिक्षण देण्यासाठी स्वतंत्र शाळा आणि वसतिगृहे उभारली. शिक्षणाद्वारे स्त्रियांना सक्षम करण्यावर भर दिला.

विधवा पुनर्विवाहाला कायदेशीर मान्यता दिली, घटस्फोटाचा अधिकार दिला. मुलांच्या लग्नाचे वय वाढवण्याचा कायदा केला.





देवदासी प्रथेवर बंदी घातली. स्त्रियांना मालमत्तेचा हक्क देणारा कायदा केला.

**राजर्षी शाहू महाराजांचा वारसा पुढे चालवूया,
स्त्री-पुरुष समानता रुजवूया!**

# शाहूकार्यातील धर्मनिरपेक्षता



"आम्ही सर्व हिंदी आहोत, बंधू आहोत. हिंदी प्रजाजन कोणत्याही वर्णाचे असोत, कोणत्याही धर्माचे असोत, ते सर्व हिंदी आहेत. व्यक्तीच्या दृष्टीने धर्माची बाब महत्त्वाची असेल, पण राष्ट्रीय बाबतीत ती केव्हाही आड येता कामा नये. यापुरती धर्म ही बाब फारच कमी महत्त्वाची आहे असे मला वाटते."

-राजर्षी शाहू महाराज (अखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषद, नागपूर)

सर्व धर्मांच्या लोकांना प्रशासनात सामावून घेतले आणि धार्मिक भेदभावाला स्थान दिले नाही.



# शाहूकार्यातील समता-बंधुता



समाजाला जातीभेदाच्या पलीकडे नेण्यासाठी एकत्रित सामाजिक समारंभ आयोजित केले, रोटी व्यवहार सुरू केला.

मिश्रविवाह तसेच आंतरजातीय विवाह व्हावेत याला प्रोत्साहन देणारा कायदा सुरू केला. स्वतःच्या चुलत बहिणीचा आंतरजातीय विवाह लावून दिला.





**राजर्षी शाहू महाराजांचा वारसा पुढे चालवूया, समतेचा जागर करूया!**

# शाहूकार्यातील कल्याणकारी राज्य



लोकांना स्वस्तात धान्य उपलब्ध करून दिले. लोकांच्या औषधोपचाराची सोय केली. अनाथालये सुरू केली आणि मुलांच्या पालनाची सोय केली.

शेतकऱ्यांना सावकारांच्या जाचातून मुक्त केले. स्वस्तात कर्जे दिली. दुष्काळ किंवा नापिकीच्या काळात करमाफी आणि सवलती जाहीर केल्या.







विचारांचा हाच वारसा पुढे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानात अंतर्भूत केला.